# प्रताप महाविद्यालय (स्वायत्त)
# मराठी विभाग
# शैक्षणिक वर्ष २०२३ - २०२४

- **उजळणी वर्गात सहभाग**

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये मराठी विभागातील प्राध्यापकांनी आपल्या विषयातील अद्ययावत ज्ञान, अध्यापन पद्धती व संशोधन प्रवाह अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांच्या वतीने आयोजित मराठी विषयाच्या उजळणी वर्गात सहभाग नोंदवला. हा उजळणी वर्ग दि. ११ ते २३ सप्टेंबर २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता.

या उजळणी वर्गात मराठी विभागातील प्रा. ज्ञानेश्वर कांबळे व विभागप्रमुख डॉ. रमेश माने यांनी सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमामध्ये विद्यापीठ स्तरावरील तज्ज्ञ प्राध्यापकांनी मराठी विषयाच्या अभ्यासक्रमातील विविध घटकांवर सखोल मार्गदर्शन केले. अभ्यासक्रमातील नवीन बदल, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, मूल्यमापन पद्धती तसेच विद्यार्थ्यांच्या उत्तरलेखनातील अपेक्षा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

उजळणी वर्गाच्या माध्यमातून आधुनिक अध्यापन तंत्र, संशोधनात्मक दृष्टिकोन, साहित्य अभ्यासातील नव्या प्रवृत्ती आणि स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने मराठी विषयाचे महत्त्व यावरही मार्गदर्शन करण्यात आले. या संवादातून प्राध्यापकांना विषय मांडणी अधिक प्रभावीपणे करण्याबाबत नवी दृष्टी प्राप्त झाली.परिणामी, या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेवर आणि विभागाच्या एकूण शैक्षणिक गुणवत्तेवर होणार आहे.

डॉ. रमेश माने
प्रमुख- मराठी विभाग
प्रताप महाविद्यालय, (स्वायत्त) अमळनेर.